नियमित फौ.ख.क्र.०४/२०२०
सर-वि- रहेमत शेख
नि.क्र.८

**सरकार तर्फे साक्षीदार क्र.__१__ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नाव : किशोर यशवंतराव भैसारे
वय : ५२ वर्षे, व्यवसाय : अधिक्षक
राहणार : भिवापूर ता. भिवापूर, जि. नागपूर.

सरतपासणी-सहा.सरकारी अभियोक्ता श्री. कन्नाके यांचे तर्फे

१. मी आरोपीस ओळखत नाही. मला पोलीसांनी बोलाविले नव्हते. पोलीसांनी माझयासमक्ष काही कारवाई केली नाही. आता मला घटना स्थळ वजा जप्ती पंचनामा दाखविला. त्यावर माझी सही नाही. त्यातील मजकूर मला माहीत नाही. असे काही घडले नव्हते की, जनावराना पकडल्यासंदर्भात कागदपत्र तयार केले होते.

सहा. सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उलटतपासात विचारण्याजोगे प्रश्न विचारण्यास परवानगी मागीतली.परवानगी दिली.
उलटतपास - सरकार तर्फे

२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २३.१०.२०१९ रोजी पोलीसांनी मला पारवे पेट्रोल पंप येथे पंचनामा करण्याकरीता बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी मला सांगितले होते की, जनावरांना आरोपी वाहनामध्ये कोंडून नेत आहे त्यासंदर्भात कारवाई करायची आहे. हे म्हणणे खरे नाही की, तेव्हा मी घटनास्थळी गेलो असता तेथे एमएच-४०-बीजी-६२५५ पांढ-या रंगाचा ट्रकामध्ये गोरा, गाय, कालवन असे एकूण ३२ जनावरे निदर्यतेने कोंढून वाहतुक करीत असल्याचे दिसून आले. हे म्हणणे खरे नाही की, दिसत्या परीस्थीतीचा जप्ती पंचनामा तयार केला तो मला वाचून व समजावून सांगितला व नंतर मी त्यावर सही केली. हे

म्हणणे खरे नाही की, त्यावर दुसरे पंच भैय्या हे तिथे हजर होते. हे म्हणणे खरे नाही की, जप्तीच्या कारवाईच्यावेळेस आरोपी हजर होता म्हणून मी त्याला ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की, माझी पंचनाम्यावर सही नाही हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला वाचविण्यासाठी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास-श्री. नागोशे वकील यांचे तर्फे आरोपी करीता - नाकारला.

उलटतपास संपला

फेरतपास - काही नाही.

श्रवणोत्तर स्विकृत
माझे समक्ष,

( एस.जे.लाड )
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.

दिनांक :०८/०८/२०२२